


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे

✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक ४७ वा. ✻ शनिवार दि.२ ऑगस्ट २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 47 ✻ Saturday 2 August 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610



## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी शिवराज मोरे यांची नियुक्ती

कराड : महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या संघटनात्मक पातळीवर महत्वाचे फेरबदल करण्यात आले असून शिवराज मोरे यांची प्रदेश युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

युवक काँग्रेस मधील संघटनात्मक पातळीवरील हे महत्वाचे फेरबदल काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सूचनेनुसार करण्यात आले आहेत. शिवराज मोरे यांना नुकतेच दिल्ली येथे युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चीब यांच्या तसेच राष्ट्रीय प्रभारी कृष्णा अलूवेरू यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.



शिवराज मोरे यांनी याआधी विद्यार्थी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदाची दोनदा जबाबदारी सांभाळली असून युवक काँग्रेसचे सरचिटणीस व उपाध्यक्ष पदाची निवडणुकीच्या माध्यमातून नियुक्ती सुद्धा झाली होती. प्रदेश युवक काँग्रेसच्या तीन वर्षांपूर्वी पार पडलेल्या निवडणुकीत शिवराज मोरे यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. एका सामान्य कुटुंबातील शिवराज मोरे यांनी आपल्या संघटनेच्या जोरावर राज्यभर आपले युवकांचे संघटन वाढवले आहे. या नियुक्तीमुळे राज्यभरातून युवक काँग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्यांना ताकद मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

यावेळी युवक काँग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे म्हणाले की, काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा माझ्यावर मोठा विश्वास दाखवलेला आहे, काम करण्याची संधी दिली आहे. त्या विश्वासाला पात्र राहून मी पुढील काळात वाटचाल करणार आहे. काँग्रेस पक्षाची युवक संघटना अधिक बळकट करण्यासाठी मी राज्यभर काम करणार आहे. काँग्रेस पक्ष हा सर्वात अनुभवी राजकीय पक्ष आहे. पक्षाचा सद्याचा काळ हा संघर्षाचा काळ असून या परिस्थितीत काँग्रेस पक्षाचे कार्य गावागावात पोहचविण्यावर माझा प्रयत्न राहील आणि यासाठी पक्ष संघटना आणखी मजबूत करण्यावर भर दिला जाईल.

## लोकेनेते राजारामबापू पाटील यांची १०६ वी जयंती साजरी

इस्लामपूर : राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर लोकेनेते राजारामबापू पाटील यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांच्या हस्ते स्व. बापूंच्या पुतळ्याचे विधिवत पूजन करून अभिवादन करण्यात आले.



राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर. पाटील, वस्त्रोद्योग महासंघाचे माजी अध्यक्ष दिलीपतात्या पाटील, कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील, शिवम प्रतिष्ठानचे इंद्रजित देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील, कार्याध्यक्ष ॲड. बाबासो मुळीक, प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन, तहसीलदार सचिन पाटील, बाजार समितीचे सभापती संदीप पाटील, उपाध्यक्ष शिवाजी आपुगडे उपस्थित होते. उपाध्यक्ष विजयराव पाटील, कार्यकारी संचालक आर.डी. माहुली, सचिव डी.एम. पाटील, कामगार नेते तानाजी खराडे व राजेंद्र चव्हाण यांनी स्वागत केले.

## कोल्हापूरला उच्च न्यायालयाचे खंडपीठ मंजूर

**१८ ऑगस्टपासून कामकाज सुरू**

कोल्हापूर : कोल्हापूर येथे अखेर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची अधिकृत घोषणा झाली असून, येत्या १८ ऑगस्ट २०२५ पासून खंडपीठाचे प्रत्यक्ष कामकाज सुरू होणार आहे. मुख्य न्यायाधीश आलोक आराधे यांच्या सहीने आणि महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या मान्यतेने राज्य सरकारच्या अधिकृत राजपत्रात याची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे.

खंडपीठ मंजुरीचा हा ऐतिहासिक निर्णय सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सोलापूर या सहा जिल्ह्यांतील जनतेच्या संघर्षाला मिळालेल्या न्यायाचा विजय मानला जात आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली ही मागणी अखेर मान्य झाल्याने या जिल्ह्यांतील लाखो नागरिकांना मुंबईला न जाता स्थानिक पातळीवरच न्याय मिळणार आहे.

राज्य पुनर्रचना कायदा १९५६ च्या कलम ५१(३) नुसार मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना हे खंडपीठ स्थापन करण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि विभागीय न्यायालये बसणार असून, अपील पक्षाचे कामकाजही येथे पार पडणार आहे.

उच्च न्यायालयाच्या राजपत्रित अधिसूचनेनुसार, १ ऑगस्ट २०२५ रोजी ही घोषणा करण्यात आली असून १८ ऑगस्टपासून प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाजास प्रारंभ होईल. या निर्णयामुळे न्यायप्रणाली अधिक सुलभ, जवळची आणि गतिमान होणार असून, कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांच्या न्यायहक्काची मोठी अडचण दूर होणार आहे. जनतेच्या दीर्घ संघर्षाचे हे फलित मानले जात असून, सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.

## बनवडी येथे विविध विकास कामांचे उद्घाटन व भूमीपूजन होणार

कराड : बनवडी, (ता. कराड) येथे श्री. बाळासाहेब पाटीलसाहेब यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या, कोयना भूकंप व पुनर्वसन निधीतून बनवडी ता.कराड येथील गजानन सरस्वती कॉलनीमधील श्री स्वामी समर्थ महाराज मंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे या कामाचे भूमीपुजन राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माननीय श्री. बाळासाहेब पाटीलसाहेब यांचे शुभहस्ते रविवार दिनांक ०३/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता होणार आहे. सदर समारंभास बनवडी व पंचक्रोशीतील कार्यकर्ते, ग्रामस्थ यांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



## एसटी महामंडळ आता पेट्रोल-डिझेलही विकणार

**ठाणे : एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्यासाठी राज्यभरात व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल आणि डिझेल विक्री करणारे पंप सुरू करण्यात येणार आहे. ही महत्त्वपूर्ण माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली असून हा प्रकल्प केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त व्यावसायिक भागीदारीतून कार्यान्वित केला जाणार आहे.**

## संजीवनी पवार यांनी विद्यार्थ्यांना सजग संवेदनशील बनविले : ॲड.सतीश पाटील

कराड : श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्टच्या संजीवनी अशोक पवार यांच्या गौरवशाली सेवानिवृत्तीप्रित्यर्थ आयोजित सत्कार समारंभ भावनिक वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी ॲड. सतीश पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून राजेंद्र माने उपस्थित होते.

ॲड. सतीश पाटील म्हणाले, विज्ञान व गणित यांसारख्या क्लिष्ट विषयांवर विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करत विषयभिती दूर केली. गरजू विद्यार्थ्यांना ड्रेस, शैक्षणिक साहित्य व फीच्या स्वरूपात मदत करणे, हे त्यांचे विशेष वैशिष्ट्य होते.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेली अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असून समाजसेवा करत आहेत. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल घडवले. शाळेतील गैरहजेरी, वादविवाद, हेवेदावे यावर नियंत्रण आले आणि विद्यार्थी सजग व संवेदनशील बनले.



श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्टचे सचिव डॉ. विजय पाटील, सहसचिव राजेंद्र पाटील, खजिनदार प्रसाद पाटील, सदस्य श्रीमती सुलभा देशमुख, गजानन माने, शरद पाटील, दीपक पवार, सौ. पवार यांचे कुटुंबीय व नातेवाईक उपस्थित होते.

प्रास्ताविक संजीवनी पवार यांनी केले. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत सेवाकाळातील आठवणींना उजाळा दिला. आभार प्रदर्शन अमर पाटील यांनी केले.

**महाराष्ट्र हायस्कूल, विठामाता हायस्कूल, शिवाजी हायस्कूल, शिवाजी हायस्कूल येथे ३२ वर्षे सेवा बजावली. त्यांच्या कडक पण प्रेमळ शिस्तीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्तप्रियता व आदरयुक्त भीती निर्माण झाली होती.**

## लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



कराड : विजयनगर येथील प्रेमलाकाकी चव्हाण माध्यमिक विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमास माजी आमदार आनंदराव पाटील, ऍड.ए.वाय.पाटील संस्थेचे सचिव प्रतापसिंह पाटील, सुपने पी एच सी चे कर्मचारी उपस्थित होते.

प्रथमता प्रतिमेची पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व आनंदराव पाटील यांनी लोकमान्य टिळक यांनी विद्यार्थी दशेपासून स्वातंत्र्य चळवळीत केलेल्या कार्याची माहिती दिली.

तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी स्वातंत्र्य चळवळ तसेच आपल्या शाहिरीच्या माध्यमातून लोक जागृती कशी केली तसेच ते स्वतः अशिक्षित असूनही त्यांनी लिहिलेले पोवाडे नाटक, चित्रपटाच्या, कथा कादंबरी याची माहिती दिली.

ॲड.ए.वाय पाटील व प्रतापसिंह पाटील यांनी मार्गदर्शन केले तर आभार विद्यालयाचे मुख्यध्यापक चव्हाण यांनी मानले.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे साहित्यखंडांचे प्रकाशन

### चित्रपट निर्मिती आणि स्मारकासाठी निधी जाहीर

पुणे : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यखंड क्र. ५, ६ व ७ चे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. अण्णा भाऊ साठेंच्या जीवनावर आधारित चित्रपट लवकरच प्रदर्शित करण्यात येईल, तसेच त्यांच्या स्मारकासाठी २५ कोटींचा निधीही जाहीर करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री म्हणाले, अण्णाभाऊंचं साहित्य क्रांतीकारी असून त्यांच्या लेखणीतून समाज परिवर्तन घडवण्याचे कार्य झाले. त्यांच्या साहित्याचा जागतिक स्तरावर गौरव झाला असून त्यावर संशोधनही सुरू आहे. ते चालते-बोलते विद्यापीठ होते, अशी गौरवपूर्ण भावना त्यांनी व्यक्त केली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, अण्णा भाऊ हे प्रस्थापित साहित्य परंपरेचे बंडखोर लेखक होते. त्यांच्या साहित्यातून वंचितांचा हुंकार प्रकट झाला. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे.

या समारंभास उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार अमित गोरखे, विजय शिवतारे, सुनील कांबळे, हेमंत रासणे, अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर उपस्थित होते. प्रकाशन समितीचे डॉ. माधव गादेकर, डॉ. बी. एन. गायकवाड, डॉ. सोमनाथ कदम, डॉ. मिलिंद कसबे, शिवा कांबळे, डॉ. प्रमोद गारोडे, डॉ. विजय कुमटेकर यांनीही सहभाग नोंदवला.

## इस्लामपूरमध्ये रस्त्यावर दिवसाढवळ्या खून

**तिघांनी पोलिसात केली शरणागती**

इस्लामपूर : किरकोळ कारणावरून वाद होऊन इस्लामपूर-ताकारी रस्त्यावरील आरआयटी कॉलेजजवळ रोहित उर्फ 'बारक्या' पंडित पवार (२३, रा. बेघर वसाहत) या युवकाचा धारदार शस्त्राने खून करण्यात आला. खून केल्यानंतर तिघांनी थेट पोलिस ठाणे गाठून आत्मसमर्पण केले.

हौसेराव कुमार आंबी (२१, रा. हुबालवाडी) आणि दोन अल्पवयीन आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहित हा पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार होता. दोन दिवसांपूर्वी रोहितने एक अल्पवयीन आरोपीला दमदाटी केली होती. आज दुपारी पुन्हा कॉलेजजवळ त्यांची भेट झाली. एकमेकांकडे रागाने पाहिल्याच्या कारणावरून वाद झाला. रोहितकडे पारळीसारखे धारदार शस्त्र होते. हल्ल्याची शक्यता लक्षात घेऊन तिघांनी पारळी हिसकावली आणि त्याच्या डोक्यावर दोन वार केले. त्यामुळे तो गंभीर जखमी झाला.

घटनेनंतर जखमी रोहितला काही नागरिकांनी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र तेथे त्याचा मृत्यू झाला. प्रभारी पोलीस उपअधीक्षक सचिन थोरबोले, पोलीस निरीक्षक संजय हारुगडे यांनी घटनास्थळी भेट दिली. सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्यात आले असून तपास सुरू आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी कल्पना बारवकर यांनी देखील तपासात लक्ष घातले आहे.



## संपादकीय....

# कोल्हापूर खंडपीठ

पश्चिम महाराष्ट्रातील जनतेसाठी, विशेषतः वकील आणि न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या नागरिकांसाठी, एक ऐतिहासिक आणि दिलासा देणारा क्षण समोर आला आहे. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाला कोल्हापूरमध्ये मंजुरी मिळाली आहे. हा निर्णय म्हणजे केवळ एक शासकीय आदेश नाही, तर लोकशक्तीच्या सातत्यपूर्ण संघर्षाचे यशस्वी फलित आहे.पश्चिम महाराष्ट्रातील वकील संघटनांनी गेली अनेक वर्षे या मागणीसाठी अथक प्रयत्न केले. विविध स्तरांवर चर्चा, निवेदने, आंदोलने होत राहिली. पण कोणत्यातरी कारणामुळे ही मागणी वेळोवेळी रेंगाळत राहिली. कोल्हापूर खंडपीठासाठी सरकार दरबारी आवाज उठवण्यात आला, पण दरवेळी आश्वासने मिळूनही ठोस निर्णय काही होईना. परिणामी, वकिलांमध्ये आणि नागरिकांमध्ये निराशा, नाराजी वाढत गेली.विशेषतः कोल्हापूर दौऱ्यावर आलेल्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पश्चिम महाराष्ट्रातील नामवंत वकिलांनी साकडे घालून, त्यांच्या समोर खंडपीठाची गरज साकारणारी ठोस मागणी लावून धरली होती. यावेळी झालेल्या चर्चेतून हा विषय पुन्हा एकदा राजकीय आणि प्रशासनिक पातळीवर ऐरणीवर आला. तरीही काही ना काही कारणामुळे खंडपीठास मंजुरी मिळेना. सरकारची उदासीनता, प्रशासनाची दिरंगाई आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यामुळे हा विषय दीर्घकाळ अनुत्तरित राहिला.या साऱ्या पार्श्वभूमीवर अखेर शासनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठास मंजुरी दिली आहे. हा निर्णय म्हणजे वकिलांनी, स्थानिक जनतेने आणि सामाजिक संघटनांनी सातत्याने घेतलेल्या संघर्षाची जिंकलेली एक न्यायिक लढाई आहे. या निर्णयामुळे केवळ वकिलांमध्येच नव्हे, तर वादी–प्रतिवादी नागरिकांमध्येही मोठा आनंद व्यक्त केला जात आहे. कोल्हापूर खंडपीठाची आवश्यकता ही फक्त कायदेशीर सोयीपुरती मर्यादित नव्हती. ती ही एक सामाजिक गरज होती. पश्चिम महाराष्ट्र, विशेषतः कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, कराड, रत्नागिरी या भागातील नागरिकांना न्यायासाठी मुंबई गाठणे केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर वेळेच्या दृष्टिकोनातूनही कठीण होते. वकिलांची फी, प्रवासाचा खर्च, मुक्कामाची व्यवस्था हे सर्व सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेले होते.त्यामुळे या खंडपीठामुळे एकीकडे न्यायप्रणाली सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुकर होणार आहे, तर दुसरीकडे स्थानिक कायदेविषयक यंत्रणांमध्येही गतिशीलता येणार आहे. या निर्णयामुळे केवळ वकिलांना कामाच्या नव्या संधी मिळतील असे नाही, तर हजारो वादींना स्थानिक पातळीवर न्यायाची वाट अधिक सहजगत्या मिळेल. या निमित्ताने एक गोष्ट प्रकर्षाने अधोरेखित होते. कोणतीही मागणी जर सातत्याने, संयमाने आणि स्पष्ट तत्त्वनिष्ठ भूमिकेने केली गेली, तर ती कधीतरी यशस्वी ठरते. कोल्हापूर खंडपीठाची मंजुरी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. हा लढा फक्त वकिलांचा नव्हता, तो या भागातील सामान्य जनतेचाही होता. त्यामध्ये सामूहिक इच्छाशक्ती, स्थानिक नेतृत्वाचे धाडस, आणि समाजहितासाठी लावून धरलेली दूरदृष्टी दिसून आली. आज या निर्णयाचा आनंद व्यक्त करताना, या लढ्याचे शिल्पकार, संघर्ष करणारे वकील, आंदोलन करणाऱ्या संघटना, आणि पाठपुरावा करणाऱ्या लोकप्रतिनिधींना सन्मानपूर्वक आठवणे आवश्यक आहे. कारण न्यायासाठीचा लढा केवळ न्यायालयात चालत नाही, तर तो रस्त्यावर, निवेदनांमध्ये आणि लोकशाही मार्गाने देखील चालतो, हे या संघर्षाने सिद्ध केले.आता कोल्हापूर खंडपीठ म्हणजे शासनाने केवळ मंजुरी पुरेशी नाही, तर योग्य पायाभूत सुविधा, न्यायमूर्तींची नियुक्ती, कर्मचार्यांचे स्थानिक भरतीकरण आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून खरेच हे खंडपीठ सशक्त करणे आवश्यक आहे. न्यायालयीन कामकाजात प्रामाणिकपणा, वेग आणि पारदर्शकता यामुळेच खऱ्या अर्थाने या निर्णयाचे फलित सिद्ध होईल. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील अन्य भागांमध्येही नवीन न्यायिक सुविधा निर्माण करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास बाळगायला हरकत नाही. कोल्हापूर खंडपीठाच्या मंजुरीने पश्चिम महाराष्ट्रातील न्याययात्रेला नवसंजीवनी मिळाली आहे. या निर्णयाचे स्वागत करताना, 'संघर्ष आणि सातत्य' हाच खरा परिवर्तनाचा मार्ग आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

# सिंदूर महारक्तदान यात्रेत सातारा जिल्ह्याचे योगदान देणार

## हिंदकेसरी संतोषआबा वेताळ यांची माहिती



**डब्बल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या संकल्पनेतून सिंदुर महारक्तदान यात्रा आयोजित केली आहे. ही यात्रा सांगली येथून सुरू होणार असली तरी सातारा जिल्हा या मोहिमेत मागे राहणार नाही. यासाठी सातारा जिल्ह्यातील जवान देशाचे नंदनवन असलेल्या जम्मू काश्मीर च्या पवित्र भूमीत जाऊन रक्तदान करणार आहेत. आदरणीय शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली ही उभी केलेली रक्तदानाची चळवळ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवून सीमेवर लढणाऱ्या जवानांसाठी रक्तदान करु या ही मोहीम गतिमान करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील कुस्ती क्षेत्रातील पैलवान पुढे येतील, असा विश्वास हिंदकेसरी वेताळ यांनी व्यक्त केला.**

कराड : सातारा जिल्हा शूरांचा आणि विरांचा जिल्हा म्हणून देशात ओळखला जातो. देशाच्या रक्षणासाठी जिल्ह्यातील जवानांचे मोलाचे योगदान आहे. अनेकांनी शत्रूला नामोहरम करताना जीवाची बाजी लावली आहे.

याच मातीतील सुपुत्र स्व. यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षणमंत्री म्हणून काम करताना आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. प्रतिकूल परिस्थितीत शत्रू बरोबर दोन हात करताना दहशतवादी, अतिरेक्यांशी लढताना सातारा जिल्ह्यातील जवानांचे रक्त सांडले आहे. त्या जवानांच्या प्रति सद्भावना व्यक्त करण्यासाठी आम्ही रक्तदान करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती हिंदकेसरी पैलवान, संतोष वेताळ (आबा) यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.यावेळी सुभेदार मेजर सुभाष दिनकर पानसकर, हवालदार अनिल जगताप, निलेश पवार, शिवाजीराव माने, हवालदार सचिन जगताप शिवसेनेचे गुलाबराव पाटील यांच्यासह निसार मुल्ला, पै. अतुल पवार, सतीश डांगे, सुधीर डांगे , अजय थोरात, अजय भोंगे, कृष्णत मदने, अरविंद यादव, पवन शिंदे, रामभाऊ फुके, रवींद्र माने, प्रताप क्षीरसागर, फिरोज पटेल आदी उपस्थित होते.

पै. संतोष वेताळ म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, पालकमंत्री शंभूराज देसाई साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदूर महारक्तदान यात्रा आयोजित केली आहे. केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारत भूमीकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्या पाकला धडा शिकवला आहे. भारत भूमीवर झालेल्या हल्ल्यामुळे कुस्ती क्षेत्रातील तमाम पैलवानांचे रक्त पेटून उठले आहे आपला युवक सीमेवर जाऊन शस्त्र हाती घेऊ शकत नाही. मात्र एक देशभक्त म्हणून रक्तदान करून सैनिकांना प्रेरणा देऊ शकतो. सिंदूर महारक्तदान यात्रा ही फक्त सुरुवात आहे.

# मा.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस ओगलेवाडीत साजरा

## गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप





ओगलेवाडी : शिवसेना पक्षप्रमुख आणि महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस ओगलेवाडी विभागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने उपतालुका प्रमुख मनोज गायकवाड आणि शिवसैनिक गणेश जांभळे यांच्या संकल्पनेतून विविध शाळांतील सुमारे १०० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

शिवसेना उपनेते व पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख नितीन बानुगडे पाटील यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले आणि उपस्थित पालक व नागरिकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रभावी भाषणशैलीने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले. उपजिल्हाप्रमुख सुनील पाटील, संपर्क प्रमुख चंद्रकांत कमाने, तालुका प्रमुख संजय भोसले, युवासेना जिल्हाप्रमुख मिलिंद तोडकर, तालुका प्रमुख विक्रम पिसाळ, तालुका संघटक उमेश अतकरे कल्याण डुबल, दीपक लिमकर, दादासाहेब डुबल, लालासाहेब डुबल, तुषार लोंढे, देवेंद्र बागल, शंकर भोसले, सुरेंद्र बेंद्रें, ओंकार थोरात, वैभव माने, मुकुंद भट उपस्थित होते.

सूत्रसंचालन अमित कांबळे यांनी तर प्रास्ताविक गणेश जांभळे यांनी केले. सय्यद, चंद्रकांत कमाने व मनोज गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. आभार संजय भोसले यांनी मानले. अमजद मुसांडे, सुभाष शिलवंत, संग्राम जाधव, अशोक अंगरखे, अभिजीत माने, सुमित जाधव, यश बोडके, शिवम बोडके, रोहित कांबळे, यश काळे, सुमित संकपाळ, कार्तिक संकपाळ, दत्ता पवार व शिवसैनिकांनी परिश्रम घेतले.

# शासनाला शेतकऱ्याच्या दूध दराचे वावडे का?

## दुधसंघ खातायत मलई; शेतकऱ्याच्या पदरात फक्त तोटाच



उंब्रज (रघुनाथ थोरात) : शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने आणि गुंतवणुकीने उभारलेल्या दुध व्यवसायाकडे शासनाचे दुर्लक्ष सुरूच असून, वाढत्या पशुखाद्य दराच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दूध उत्पादन परवडेनासं झालं आहे. दरम्यान दुधउत्पादकांच्या कष्टाचं चीज न होता, दुधसंघांतील बड्या मंडळींच्या मुठीत दुधाची मलई जात असल्याचा संताप शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

गेल्या पंधरा–वीस वर्षांत पशुपालन व्यवसायात सुशिक्षित तरुणांनी आधुनिक पद्धतीने मोठी गुंतवणूक करत दुध व्यवसायास व्यावसायिक स्वरूप दिलं. मुक्त गोठा, मिल्किंग मशीन, चारा कापणी यंत्र, निवारा शेड, अशा पायाभूत सुविधांवर मोठा खर्च केला जातो. मात्र, दूध उत्पादन खर्चाच्या तुलनेत विक्री दर फारच कमी आहे.

सध्या गाईच्या ३.५ फॅटच्या दुधाला २९–३२ रुपये दर मिळतो, तर हेच दूध शहरात ५०–६० रुपयांना विकलं जातं. दर दहा दिवसांनी मिळणारं बिल पूर्णतः पशुखाद्यावर खर्च होत असल्याने शेतकऱ्यांच्या हाती काहीच राहत नाही. या तफावतीचं मूळ संकलन केंद्रांपासून दुध संघांपर्यंत पोहोचलेल्या दलाली व्यवस्थेत आहे, असं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे.

दुध संकलनात होत असलेली वजन काटामारी, मशीनमध्ये फॅट्स कमी करण्यासाठी होणारी छेडछाड, आणि शेतकऱ्याच्या मेहनतीची पातळी गाठलेली मलई खाणारी लॉबी – ही शोषणाची साखळी उध्वस्त करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**पशुखाद्य दरवाढीचा आढावा (प्रती क्विंटल) :**

| खाद्याचे नाव | पूर्वीचा दर | सध्याचा दर |
|---|---|---|
| सरकी पेंड | ११०० | १५५० |
| गोळी पेंड | ८०० | १६५० |

**दूध उत्पादनाचे वाढते खर्च आणि कमी दर ह्यामुळे आम्ही पशुधन वाऱ्यावर सोडायच्या स्थितीत आलो आहोत. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून उत्पादन खर्चावर आधारित दूध दर जाहीर करावा.**
**– शेतकरी सचिन जाधव, उंब्रज**

# अण्णाभाऊ साठेंचा 1 ऑगस्ट 'लेखन प्रेरणादिन' म्हणून पाळावा : कॉ. सुबोध मोरे




सातारा – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिवस १ ऑगस्ट 'लेखन प्रेरणादिन' म्हणून शासनाने आणि जनतेने पाळावा, असे आवाहन डाव्या चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते कॉ. सुबोध मोरे यांनी येथे केले.

संबोधी प्रतिष्ठानच्या वतीने नगर वाचनालयाच्या पाठक हॉलमध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या १०५व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिनकर झिंब्रे होते. मंचावर अॅड. हौसेराव धुमाळ, रमेश इंजे उपस्थित होते.

कॉ. मोरे म्हणाले, अण्णाभाऊंचे क्रांतिकारक साम्यवादी विचार आजही तितकेच प्रभावी आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अमर शेख, गव्हाणकर, आत्माराम पाटील यांच्यासह त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांच्या साम्यवाद निष्ठेच्या ओळखीचा इतिहास पुसण्याचा प्रयत्न अयोग्य असून त्याविरुद्ध जनजागृती गरजेची आहे.


दिनकर झिंब्रे यांनी सांगितले की, अण्णाभाऊ हे मराठीतील पहिले विद्रोही लेखक होते. फकिरासह ३५ कादंबऱ्या, कथा, लोकनाट्य, शाहिरीसारखे उदंड साहित्य त्यांनी निर्माण केले. तरीही समीक्षकांनी त्यांच्या प्रतिभेला योग्य न्याय दिला नाही, ही खंत त्यांनी हयातीतच व्यक्त केली होती.साताऱ्यात होणाऱ्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची योग्य दखल घेत गौरव व्हावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. डॉ. तानाजीराव देवकुळे यांचा सत्कार करण्यात आला. हौसेराव धुमाळ यांनी अण्णाभाऊंच्या साहित्यावर आधारित गीत सादर केले. डॉ. सुवर्णा यादव यांनी आभार मानले.

# महामंडळावर राजेंद्र राजपुरे यांना संधी द्यावी ;कार्यकर्त्यांची मागणी

प्रतापगड : महाबळेश्वर तालुक्यात गेली अनेक वर्षे राजकीय व सामाजिक क्षेत्रात निष्ठेने कार्यरत असलेल्या राजेंद्र शेठ राजपुरे यांना आगामी काळात राज्यातील कोणत्याही महामंडळावर नियुक्ती द्यावी, अशी जोरदार मागणी कार्यकर्त्यांकडून होत आहे.

वाई, खंडाळा, महाबळेश्वर व जावली या तालुक्यांमध्ये राजपुरे यांनी जनतेशी थेट संवाद साधून शासन योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली. विशेषतः दुर्गम व डोंगरी भागातही ते सातत्याने पोहोचले. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणून काम करताना त्यांनी युवकांसाठी रोजगार प्रशिक्षण उपक्रम राबवले. महाबळेश्वर तालुक्यातील स्टॉबेरी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.स्व. बाळासाहेब भिलारे यांच्यानंतर तालुक्याच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारा नेता म्हणून राजपुरे यांची ओळख निर्माण झाली आहे. प्रत्येक गावात जाऊन समस्या जाणून घेऊन त्या मार्गी लावण्याची त्यांची कार्यशैली लोकांमध्ये लोकप्रिय ठरली आहे.स्थानिक युवा नेते संतोष जाधव म्हणाले, महाबळेश्वर तालुक्याला राजकीय संधी कमी आहेत. जर यावेळी राजपुरे यांना महामंडळावर स्थान मिळाले, तर हे तालुक्याच्या दृष्टीने गौरवाची बाब ठरेल. सध्या मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या राजपुरे यांच्याकडून तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जबाबदारी अपेक्षित असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

# आता रडायचे नाही, लढायची वेळ




आपण रोजच वर्तमानपत्रांमध्ये मुलींवरील अत्याचार आणि अन्यायाच्या बातम्या वाचतो. अनेक मुली बेपत्ता होतात आणि अशा घटनांमुळे समाजातील प्रत्येक मुलीच्या मनात एक भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकतीच साताऱ्यात घडलेली एकतर्फी प्रेमातून शाळकरी मुलीवर झालेली हृदयद्रावक घटना, ही आपल्याला डोळ्यात अंजन घालणारी आणि चित्त थरारक आहे. हे पाहून, आता मुलींनी स्वतःचे रक्षण स्वतःच करण्याची वेळ आली आहे, असे कुणालाही वाटल्याशिवाय राहणार नाही.

मुलींनो, आता रडण्याऐवजी लढण्याची वेळ आली आहे! आपणच आपले रक्षण करूया. ब्रिटिश काळात होऊन गेलेल्या रणरागिणींचा इतिहास आठवा. इंग्रजांचे राज्य असूनही त्या किती सतर्क होत्या! अखेरच्या श्वासापर्यंत त्या अन्यायाविरुद्ध लढल्या आणि त्यांनी कधीही हार मानली नाही. आपणही त्यांचा आदर्श घेऊन आपले जीवन आनंदमय करूया.

मुलींनी स्वतःचे रक्षण स्वतःच करावे यासाठी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने साताऱ्यात येत्या रविवारी, दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी एक स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. या शिबिराचा आपण नक्कीच लाभ घ्यावा.

या शिबिरात आपण कराटे, दंड साखळी, लाठी–काठी यांसारख्या स्वसंरक्षणाच्या विविध कला शिकणार आहोत. खऱ्या प्रसंगांचा सराव करून आपण कोणत्याही परिस्थितीत आपले रक्षण कसे करावे, हे शिकवले जाईल. याचा आपल्याला शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्तरावर लाभ होईल. आपले मनोबल वाढेल आणि कोणत्याही प्रसंगावर मात करण्याची शक्ती मिळेल. तरी सर्वांनी याचा लाभ करून घ्यावा.

सर्व पालकांना नम्र विनंती आहे की, असे प्रसंग पुन्हा घडू नयेत म्हणून आपल्या मुलींना प्रशिक्षित करणे हे आपले कर्तव्य आहे. याचा विचार करून मुलींना या प्रशिक्षण वर्गाचा लाभ घेण्यासाठी अवश्य पाठवावे.

**– नलिनी सूर्यवंशी**, कराड

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन – ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा – ४१५११० येथून प्रकाशित केले. ✲ संपादक – गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# ऑपरेशन सिंदुरमधील जवानाचा तांबवेत सत्कार



कराड : भारतीय सैन्यदलाच्या ऑपरेशन सिंदुरमध्ये जवानांनी जीवाची बाजी लावुन आतंकवाद्यांचा प्रतिकार केला. त्यामध्ये तांबवे (ता. कराड) गावचे सुपुत्र सुभेदार दत्तात्रय बबन चोपदारही होते. त्यांच्या या शौर्याबद्दल तांबवेतील सामाजीक कार्यात अग्रेसर असलेल्या संगम गणेश मंडळाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

जम्मु-काश्मिरमधील पुलवामा सेक्टरमध्ये अचानक दशतवाद्यांनी हल्ला चढवला. त्यामध्ये निष्पाप भारतीयांना प्राण गमावावा लागला. त्यांची माहित मिळताच सैन्यदल अलर्ट झाले आणि त्यांचा हा हल्ला भारतीय सैन्यदलाच्या जवानांनी परतवुन लावला. त्यामध्ये भारतीय सैन्यदलातील सुभेदार श्रीनगरमध्ये सध्या कार्यरत असलेले दत्तात्रय चोपदार यांचाही समावेश होता.

त्यांनी २५ वर्षे भारतीय सैन्यदलात सेवा बजावली आहे. सुभेदारपदी पदोन्नती मिळाली आहे.

काही दिवस सुट्टीसाठी ते गावी आले आहेत. त्याची माहिती मिळताच तांबवेतील संगम गणेश मंडळाच्या गणेशोत्सव समितीचे अध्यक्ष अनिल बाबर, उपाध्यक्ष विकास पाटील, नितीन पाटील, विशाल पाटील, गणेश देसाई, शंकर ताटे, सुशांत पाटील, राहुल पाटील, दत्तात्रय चोपदार, जयवंत बाबर, मयुर देसाई याच्यावतीने सत्कार करण्यात आला.

सुभेदार श्री. चोपदार यांनी ऑपरेशन सिंदुरमधील घटना-घडामोडींची माहिती दिली. भारतीय सैन्यदलाच्या पराक्रमाची यशोगाथा ऐकुण उपस्थितांच्या अंगावर शहारे आले.

# संवादकला आत्मसात करणे गरजेचे : प्रा.सुहास निर्मळे

## गझल, कविता आणि भावगीतांनी रसिक मंत्रमुग्ध



सातारा : छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे मराठी विभाग व अजिंक्यतारा मराठी भाषा प्रसार युवक मंडळाच्या वतीने 'मराठी भाषा कौशल्ये, आधुनिक तंत्रज्ञान व व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून प्रा. सुहास निर्मळे यांनी विद्यार्थ्यांना संवादकलेचे महत्त्व समजावून सांगितले. तंत्रज्ञानाच्या युगातही माणसामाणसांतील नाते संवादानेच जपले जाते, त्यामुळे संवादकला आत्मसात करणे गरजेचे आहे.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते. प्रारंभी डॉ. विद्या नावडकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुभाष वाघमारे यांची कल्पना प्रत्यक्षात साखर झाली. दुसऱ्या सत्रात प्रा. अमोल चांदेकर यांनी 'संभाषण, वादन व गायन कौशल्ये' यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सादर केलेल्या गझल आणि भावगीतांनी श्रोते भावविवश झाले.कवी प्रवीण बुचडे यांनी कवितांनी प्रेक्षकांचे मन जिंकले. संतोष डांगे यांच्या भावगीतांनी वातावरण अधिक रसरशीत केले. प्रा. डॉ. अनिल बनसोडे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि व्यक्तिमत्त्व विकासावर उपयुक्त माहिती दिली.

विद्यार्थी अनिकेत पडघे याने 'विसरू नको रे आईबापाला' हे गीत हार्मोनियमसह सादर करून सर्वांचे कौतुक मिळवले. आकाशवाणीच्या निवेदिका मानसी निर्मळे यांनी वृत्तनिवेदन व अभिनय याबाबत प्रभावी मार्गदर्शन केले. प्रथमेश बाबर व अनिकेत पडघे यांच्या क्रियाशीलतेबद्दल सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन त्रिशाली शिंदे तर आभार तनुजा चव्हाण यांनी मानले.

# वृद्धेच्या डोक्यात दगड घालून खून केल्याप्रकरणी आरोपीस जन्मठेप

औंध : खटाव तालुक्यातील अंभेरी येथील एका महिलेचा डोक्यात दगड घालून खून केल्याप्रकरणी प्रशांत उर्फ संतोष विश्वनाथ ननावरे याचेवर औंध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाने आरोपीला कलम ३०२अन्वये दोषी ठरवून जन्मठेप ठोठावली. सरकार पक्षाच्या वतीने १२ साक्षीदार तपासण्यात आले.साक्षीदारांचे जाब-जबाब, कागदोपत्री पुरावा, सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश .व्ही.बी. काकतकर यांनी आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

मयत सुशीला ननावरे त्यांच्या घरासमोर कोंबडयाची पिल्ले राखत बसल्या होत्या. संशयित आरोपी प्रशांत ननावरे हा सुशिला ननावरे यांच्याशी बोलत बसला होता. सुशीला ननावरे यांच्या डोक्यात जोरात दगड मारुन गंभीर जखमी करून आरोपी तेथून पळून गेला होता.



तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील जाधव व दप्तरी पोलीस नाईक डी.वाय. देवकुळे यांनी साक्षीदारांचे जाब-जबाब नोंदवले. कसून तपास करून आरोपींविरुद्ध अति.जिल्हा व सत्र न्यायालय, वडुज येथे दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षाच्या वतीने जिल्हा सरकारी वकील वैभव हरीश काटकर यांनी काम पाहिले,सदर खटला चालवणे कामी उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी शेंडगे,सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश मते यांनी मार्गदर्शन केले. प्रॉसिक्युशन स्क्वाड पोलीस कॉन्स्टेबल जयवंत शिंदे पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय जाधव, महिला पोलीस हवालदार विजयालक्ष्मी दडस,पोलीस कॉन्स्टेबल अमीर शिकलगार,पोलीस कॉन्स्टेबल सागर सजगणे यांनी सहकार्य केले.

# एम-सॅन्ड उत्पादनासाठी इच्छुक व्यक्ती, व्यावसायिकांनी अर्ज करावेत : संतोष पाटील

सातारा : राज्य शासनाच्या महसूल व वनविभागाच्या २३ मे २०२५ च्या शासननिर्णयाद्वारे नैसर्गिक वाळूला एम-सॅन्ड म्हणजे कृत्रिम वाळू पर्याय म्हणून विकसित करण्याच्या अनुषंगाने धोरण निश्चीत करण्यात आले आहे.

यानुसार कृत्रिम वाळू धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबची कार्यपध्दती निश्चती करण्यात आलेली आहे. कृत्रिम वाळू धोरणाबाबत लाभ घेण्यासाठी सातारा जिल्ह्यात कार्यरत असलेले क्रशरधारक जे १०० टक्के एम-सॅन्ड उत्पादीत करण्यास इच्छूक आहेत व खाजगी जमिनीमध्ये नव्याने क्रशर घालून १०० टक्के एम-सॅन्ड उत्पादित करण्यास इच्छूक आहेत, अशा व्यक्ती व व्यावसायिकांनी शासनाच्या महाखनिज ारहरज्ञहरपळक्ष.ारहरीरीहींीर.सीीं.ळप या संगणक प्रणालीवर महा इ-सेवा केंद्र किंवा वैयक्तिकरित्या अर्ज करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सातारा जिल्हा प्रशासनाच्यावतीने केले आहे.



एम-सॅन्ड या धोरणानुसार सातारा जिल्ह्यामध्ये प्रथम पुढाकार घेणाऱ्या महाराष्ट्र राज्याचा अधिवास असलेल्या व महाराष्ट्रात नोंदणी असणाऱ्या ५० संस्था इत्यादिंना एम-सॅन्ड युनिट स्थापन करण्याकरीता उद्योग व महसूल विभागच्या सवलती लागू राहतील. इच्छुक असलेल्यांनी महाखनिज प्रणालीवर अर्ज करताना अर्जासोबत गट नं., नकाशा, सातबारा, आधारकार्ड, पॅन कार्ड, ५२० रुपये अर्ज फी रक्कम यांची आवश्यकता आहे.

असे प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस सादर करतांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडील कन्सेंट टू इस्टाब्लिश व कन्सेंट टू ऑपरेटबाबतचे प्रमाणपत्र, ज्या क्षेत्रावर एम-सॅन्ड बसविण्यात यणार आहे अशा क्षेत्राबाबत संबंधित नियोजित प्राधिकरणाकडून त्याबाबतचा वापर अनुज्ञेय आहे, किंवा कसे याबाबत नाहरकत प्रमाणपत्र, आवश्य त्या ठिकाणी अकृषिक परवानगी आदेश, तसेच उद्योग आधार नोंदणी/जिल्हा उद्योग केंद यांची नोंदणी असणारे प्रमाणपत्र व व्यापारी परवाना घेणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी, जिल्हाधिकारी कार्यालयातील गौणखनिज शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केले आहे.

# योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

सातारा - इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडुन राज्यातील महानगर पालिका, विभागीय शहरे जिल्हास्तरावरील सर्व शैक्षणीक संस्थामध्ये प्रवेश घेतलेल्या मान्यताप्राप्त शासकीय, अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालय, तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेणाऱ्या व वसतिगृह योजनेपासून वंचित असणाऱ्या धनगर समाजातील विद्यार्थी निवासी व शैक्षणिक सुविधांपासुन वंचित राहू नये यासाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणारे व ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाख पेक्षा कमी आहे असे विद्यार्थी पात्र असून जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास प्रतिवर्ष ४३ हजार व तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रुपये ३८ हजार प्रमाणे लाभाचे वितरण केले जाणार आहे.

या योजनेंतर्गत बी.ए, बी.कॉम, बी.एस.सी अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए, एम.एससी असे पदवीनंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या प्रथम, व्दितीय, तृतीय वर्षाकरिता ऑनलाईन अर्ज १७ ऑगस्ट पर्यत हारी. ारहरळीं.ास वर प्रवेश अर्ज भरता येणार आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या धनगर समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन कांचन जगताप, सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्यान,सातारा यांनी केले आहे.

# विविध उपक्रमांनी साजरा होणार महसूल सप्ताह : तहसिलदार समीर यादव

सातारा - दरवर्षी राज्यात १ ऑगस्ट हा दिवस महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने सातारा तालुक्यात महसूल सप्ताहाचे १ ते ७ ऑगस्ट कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या साप्ताहात नागरिकांना हितावह ठरतील असे विविध उपक्रम राबवण्यात येणार असून या महसूल सप्ताहाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सातारा तालुक्याचे तहसिलदार समीर यादव यांनी केले आहे.

नागरिकांमध्ये जागरुकता वाढवून शासनाबद्दल व महसूल विभागाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दींगत व्हावा यासाठी महसूल सप्ताहामध्ये उपविभागीय अधिकारी आशिष बारकूल यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा तालुक्यात पुढील उपक्रमांचे व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

१ ऑगस्ट, २०२५ रोजी महसूल विभागातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा-यांचे संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. उत्कृष्ट काम करणा-या अधिकारी, कर्मचाऱ्यांना पुरस्कार वितरीत करण्यात येत आहे.




२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबापैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबांना या अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यकमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

३ ऑगस्ट रोजी पाणंद, शिवरस्ते मोजणी करुन अतिक्रमणमुक्त करणे व त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात येणार आहेत.

४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळामध्ये राबविण्यात येणार आहे.

५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांची घरभेटी देऊन डीबीटी करून अनुदानाचे वाटप करण्यात येणार आहे.

६ ऑगस्ट शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व शासननिर्णयानुसार शर्तभंग जमिनींबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

७ ऑगस्ट रोजी एम-सॅण्ड धोरणाची अमंलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास नेण्याचा कार्यक्रम राबवून महसूल सप्ताहाची सांगता समारंभ आयोजित करण्यात येणार आहे.

# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अभिवादन

इस्लामपूर : महाराष्ट्राचे माजी जेष्ठ मंत्री मा. डॉ. आण्णासाहेब डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या येथील दीनदयाळ मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त जन्मगावी वाटेगाव ता. वाळवा येथील पुतळ्यास इस्लामपूरचे माजी नगराध्यक्ष, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, दीनदयाळ मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर मा. अँड. राजेंद्र ऊर्फ चिमणभाऊ डांगे यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.



यावेळी वाटेगावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. नंदाताई चौगुले, उपसरपंच सौ. सोनालीताई पाटील, माजी सरपंच प्रकाश पाटील, बजरंग कदम, उमेश गावडे, भारतीय जनता पार्टीचे युवा नेते राहुल पाटील, दिलीप कापसे, संभाजी जाधव, रामचंद्र फोंडे, वसंत फसाले, मंगेश लवटे, जयसिंग उथळे, कृष्णदेव शेळके, संजय शेवाळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. अँड राजेंद्र ऊर्फ चिमणभाऊ डांगे यांचा स्वागत व सत्कार वाटेगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चे व्हा. चेअरमन हेमंत मुळीक, अभिजित मुळीक, दिनकर देसाई, सचिन गावडे, पै. जयवंत नांगरे, रोहित मुळीक, दादासो सावंत यांनी शाल, श्रीफळ, पुष्पहार व बुके देवून सत्कार केला. संयोजन बजरंग कदम, अदित्य यादव, जगदीश कुशिरे यांनी केले.

# गिर नॅशनल पार्कमधील जय-वीरुची अजरामर दोस्ती संपली

**(सनी लोहोरा)**

माणसांप्रमाणेच जनावरांनाही मैत्री असते ? याचं उत्तर म्हणजे गुजरातमधील गिर नॅशनल पार्कमधील दोन सिंह जय आणि वीरू. अनेक वर्षं जंगलावर एकत्र राज्य करणारी ही जोडी अखेर आता उरली नाही. वीरूच्या मृत्यूनंतर अवघ्या काही आठवड्यांत जयनेही या जगाचा निरोप घेतला.



गिर नॅशनल पार्कची ओळख बनलेली जय-वीरूची जोडी सोशल मीडियावर नेहमी चर्चेचा विषय ठरायची. त्यांच्या अनोख्या सख्यामुळे त्यांना शोले चित्रपटातील जय-वीरू ह्या अजरामर जोडीची उपमा मिळाली. अनेक वर्षं एकत्र राहत, एकमेकांना साथ देत त्यांनी जंगलात एकत्रितपणे नेतृत्व केलं. एक शिकार करत असताना दुसरा टेहळणी करत असे. एका टोळीचे नेतृत्व दोन सिंहांनी सामंजस्याने करणं ही दुर्मीळ बाब होती.

वन विभागाचे अधिकारी मोहनराम यांच्या माहितीनुसार, जय आणि वीरू हे १५-१६ मादी सिंहांसोबत राहत होते. त्यांच्या मैत्रीचं विशेष आकर्षण इतकं होतं की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा गिर नॅशनल पार्कला भेट देऊन या जोडीला प्रत्यक्ष पाहिलं होतं. या अजरामर मैत्रीवर २०२२ मध्ये 'रायझिंग किंग्ज द मॅजेस्टिक जर्नी ऑफ जय अँण्ड वीरू' ही डॉक्युमेंटरीही प्रदर्शित झाली होती.


मात्र, २०२५ च्या जून महिन्यात या दोघांना पहिल्यांदाच वेगळं फिरताना पाहण्यात आलं.

याच दरम्यान, दुसऱ्या सिंहाच्या टोळीने वीरूवर हल्ला केला. गंभीर जखमी झालेल्या वीरूचा ११ जून रोजी मृत्यू झाला. वीरूच्या वियोगानंतर एकटा पडलेल्या जयनेही ३० जुलै रोजी प्राण सोडले. त्यांची ही मैत्री प्रत्यक्षात तेरे जैसा यार कहां या गीताप्रमाणे जगण्यासाठी आणि एकत्र मरण्यासाठी होती.

गिरचं जंगल हे आता 'जय आणि वीरू' या नात्याशिवाय पोरकं झालं आहे. मात्र, त्यांच्या या मैत्रीची गोष्ट जंगलाच्या इतिहासात अजरामर ठरेल, यात शंका नाही.

# खातवळ येथे रविवारी श्री गणेश प्रतिष्ठापना व कलशारोहन

वडूज : खातवळ (ता. खटाव ) येथील सनंद मळ्यात रविवारी (दि. ३) श्री गणेश मूर्ती प्रतिष्ठापना व कलशारोहन समारोह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजकानी दिली. शनिवारी (दि. २) सायंकाळी श्री च्या मूर्तीची व कलशाची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येणार असून रविवारी (दि. ३) सकाळी नऊ वाजतां महाभिषेक व महापूजा होणार आहे. तर आकरा वाजतां होम हवन करण्यात येणार आहे. दुपारी एक वाजतां महिलासाठी हळदी कुंकूचा कार्यक्रम होणार आहे.



पावणे दोन वाजता श्री च्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाल्यावर दोन वाजून पाच मिनिटांनी वडगाव (ज. स्वा.) येथील मठाधिपती विठ्ठल स्वामी महाराज यांचे हस्ते कलशारोहन करण्यात येणार आहे. त्यानंन्तर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे व सोनिया गोरे उपस्थित राहणार असून परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकानी केले आहे.

# जिल्हास्तरीय महसूल सप्ताहाचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ

## सप्ताहात शेवटच्या घटकांपर्यंत लाभ द्या : संतोष पाटील

सातारा : शासनाची कोणतीही नवीन योजना सुरु केली तर ती राबविण्याची महसूल विभागाला प्रथम जबाबदारी दिली जाते. महसूल विभाग हा प्रशासनातील महत्वाचा घटक आहे. महसूल दिनानिमित्त १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात शेवटच्या घटकांपर्यंत पोहचून महसूल विभागाच्या विविध योजनांचा लाभ द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले.

महसूल दिनाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय महसूल सप्ताहाचा शुभारंभ जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या शुभारंभप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने, जिल्हा पुनर्वसन अधिकारी मनोहर गव्हाड आदी उपस्थित होते.



अनंत काळापासून महसूल विभाग कार्यरत आहे. आपआपल्यापरिने यामध्ये सर्वांनी योगदान दिले आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, कामकाजाच्या मदतीसाठी पुर्वी साधने उपलब्ध नव्हती आपण आता सॅटेलाईट पर्यंत पोहचलो आहे. आत्ताचे मिसूल विभागाचे काम डिजीटल झाले आहे. १ ते ७ ऑगस्ट पर्यंतच्या महसूल सप्ताहात प्रत्येक दिवशी विविध उपक्रमांची जबाबदारी देण्यात आली आहे. ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी. शासनाने १५० दिवसांचा कार्यक्रम हाती घेतला आहे यामध्ये या सप्ताहातील कामांची नोंद घेण्यात येणार आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या काही अडचणी असतील तर त्यांनी थेट येऊन सांगाव्यात. महसूल सप्ताह राबविण्यातही अग्रेसर राहील या पद्धतीने काम करा, असेही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी सांगितले.सातारा जिल्हा विविध योजना राबविण्यात नेहमीच अग्रेसर राहिला आहे. महाबळेश्वरच्या तत्कालीन तहसीलदार तेजस्विनी पाटील यांची बदली झाली आहे, परंतू महाबळेश्वर तहसीलदार पदी त्यांना परत आणा, असे महाबळेश्वर परिसरातील नागरिक सांगत आहे. त्यांनी तालुक्यात चांगले काम केले आहे. त्याची दाद नागरिकांनी घेतली हीच आपल्या कामाची पोहोच पावती आहे. अशाच पद्धतीने इतरांनीही काम करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केले.

प्रत्येक नागरिकाच्या जीवनात अनेकदा महसूल विभागाचा संबंध येतो. महसूल विभाग अत्यंत महत्वाचा असून या विभागावर मोठी जबाबदारी आहे. महसूल सप्ताहात शासनाच्या सर्व योजना तळागाळातील घटकापर्यंत पोहचवा, असे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन सांगितले. महसूल दिन हा महसूल विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा अभिमानाचा दिवस आहे. या दिवशी महसूल विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहित करण्यात येते. या विभागावर शासनाने अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या दिल्या आहेत त्या सक्षमपणे जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. नागरिकांकडून येणारे काम किंवा तक्रारी संवेदशिनपणे हाताळावे, असे अपर जिल्हाधिकारी श्री. माने यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी महसूल सप्ताहात करण्यात येणाऱ्या कामकाजाची व मागील वर्षी केलेल्या कामाचा आढावा सांगितला. सुत्रसंचालक सितल करंजेकर यांनी केले. सर्व उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जोतिबा मंदिराचा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन

औंध : पळशी येथील ग्रामदैवत श्री जोतिबा मंदिराचा जिर्णोद्धार मूर्ती, प्राणप्रतिष्ठा व भव्य कलशारोहण सोहळा कार्यक्रम रविवारी दिनांक ३ ऑगस्ट रोजी आयोजित केला असल्याची माहिति संयोजकांनी दिली.



शुक्रवारी सर्व देवी देवतांची मूर्तीची व कलशांची रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.ह. भ. प. अमोल महाराज सूळ मोरोची यांचा भव्य दिंडी सोहळा झाला. आज शनिवारी श्रींची मूर्ती धान्यवासातून काढून जलवासात ठेवणार आहेत,२१ सुवासिनींची कलशासह ग्रामप्रदक्षिणा व जलाभिषेक करण्यात येणार आहे, दुपारी दोन वाजता २१ जोडप्यांसह होमहवन व श्रींचा अभिषेक करण्यात येणार आहे. सायंकाळी सहा वाजता प्रसाद वाटप करण्यात येणार आहे, संध्याकाळी आठ वाजता माऊली भजन मंडळ वडूज यांची जुगलबंदी कार्यक्रम होणार आहे.

रविवारी दि. ३ वाजता मठाधिपती विठ्ठल महाराज स्वामी यांचे शुभहस्ते कलशारोहन व जोतिबा देवाचे पुजारी संदीप भिकाजी उपारे यांचे शुभहस्ते मूर्ती प्राणप्रतिष्ठा होणार आहे, धार्मिक कार्यक्रम विधी अशोक काका वरुडकर हे करणार आहेत, दुपारी दोन वाजता आजी-माजी सैनिक, पोलीस व प्रतिष्ठित मान्यवर यांचा सत्कार सोहळा होणार आहे. तसेच पळशी गावच्या सर्व माहेरवाशीनी हळदी-कुंकू व ओटी भरन कार्यक्रम होणार आहे. व सायंकाळी पाच वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रामदैवत श्री जोतिबाराया जिर्णोद्धार कमिटी व ग्रामस्थ मंडळ पळशी यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी नंदकुमार कुंभार

इस्लामपूर : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पदी नंदकुमार कुंभार यांची फेर निवड करण्यात आली. या निवडी भारतीय काँग्रेस पक्षाचे मुख्य सरचिटणीस खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी जाहीर केले आहेत. खासदार के. सी. वेणुगोपाल म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाची बांधणी करत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करावे लागणार आहे. समाजाची कामे एक निष्ठेने करत काँग्रेस पक्षाचे विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचून राहणीमान उंचावण्यासाठी काम करावे.



काँग्रेस पक्षाचे काम प्रामाणिक व निष्ठेने करणार आहे काँग्रेस पक्ष आघाडी बरोबर संघटन करण्यावर भर देण्यात येणार आहे. काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक रचनेचे नव्याने बळकटीकरण सुरू करणार आहे. महाराष्ट्रातील पारंपरिक बारा बलुतेदार समाज, इतर मागासवर्गीय घटकांच्या सामाजिक उन्नतीसाठी ठोस उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तरुणाईसाठी नेतृत्व-विकास आणि सशक्तीकरणाचे धोरणात्मक प्रयत्न करावे लागणार आहेत. ग्रामीण भागांपर्यंत काँग्रेस पक्षाच्या लोकशाही विचारांचा आणि संविधानिक मूल्यांचा प्रभावी प्रसार करण्याची गरज आहे. कार्य हीच पूजा या विचाराने प्रेरित होऊन, जबाबदारीच्या कार्यभाराकडे सेवाभाव, सच्चरित्रता आणि निर्भयतेने वाटचाल करण्यात येत असल्याचे नूतन सरचिटणीस नंदकुमार कुंभार यांनी सांगितले.

# शिराळामध्ये राजारामबापू यांची जयंती उत्साहात साजरी

शिराळा : लोकनेते राजारामबापू पाटील यांची १०६ वी जयंती राजाराम बापू सहकारी बँकेच्या शिराळा शाखेत साजरी करण्यात आले. यावेळी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार व फोटो पुजन शिराळा तालुका जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष माजी प्राचार्य आर बी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.



सदर कार्यक्रमास डी. एन. मिरजकर, डी.जी. आत्तार, बी. टी. निकम, सुशांत पाटील संतोष बांदिवडेकर, प्रताप दिलवाले, लक्ष्मण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

सदर कार्यक्रमांमध्ये खातेदार सभासद यांच्या दहावी बारावी मध्ये उत्तीर्ण झालेल्या मुलांचा भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाखाधिकारी सलीम पटेल यांनी स्वागत केले तर ज्युनिअर ऑफिसर अविनाश पवार यांनी आभार मानले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा : ओंकार इंगळे

औंध : खटाव तालुक्यातील औंध या गावातील पत्रकार ओंकार इंगळे यांनी १ ऑगस्ट २०२५ रोजी अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती दिवशीच सातारा जिल्हा अधिकारी यांना लेखी निवेदन देत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना महाराष्ट्र राज्य, भारत सरकार यानी भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे असे निवेदन देत मागणी केली आहे.

अण्णा भाऊ साठे यांना भारत रत्न पुरस्कार दिल्याने या पुरस्कारची शोभा वाढणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील वस्त्यांमध्ये जाऊन



प्रवास प्रबोधनाच्या माध्यामातून स्वातंत्र्यपूर्व काळापासून सर्व सामान्याना कळेल अशा सोप्या भाषेत प्रबोधन करणारे जगविख्यात साहित्यिक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यानी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित घटकाला न्याय देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

आण्णाभाऊ साठे यांनी अनेक कादंबऱ्या लिहून व चित्रपट, कथा लिहुन देशाला मोठे योगदान दिले आहे. अशा परिवर्तनवादी महापुरुषाला भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करावे जेणेकरून त्यानी केलेले कार्य येणाऱ्या पिढीला प्रेरित करेल. या आधीही अनेक संघटना, कार्यकर्ते, समाजसेवक यांनी आवाज उठवला आहे परंतु महाराष्ट्र सरकार, व केंद्र सरकार यांनी झोपेचे सोंग घेतलेले असावे त्यामुळे आता सरकारने जागे होऊन या मागणीचा विचार करत पुढील कार्यवाही करावी अशी मागणी ओंकार इंगळे यांनी केली आहे.

# प्रा.निलेश डामसे यांना 'महात्मा गांधी शिक्षा प्रतिभा सन्मान'

## हिंदुस्तानी प्रचार सभा मुंबईकडून पुरस्कार जाहीर

इस्लामपूरल: महात्मा गांधी यांनी १९४२ मध्ये स्थापन केलेल्या हिंदुस्तानी प्रचार सभा, मुंबई या संस्थेने इस्लामपूर येथील प्रा. निलेश डामसे यांची महात्मा गांधी शिक्षा प्रतिभा सन्मान-२०२५ या मानाच्या पुरस्कारासाठी निवड केली आहे. हा पुरस्कार दक्षिण भारत व महाराष्ट्रातील निवडक व्यक्तींना देण्यात येणार असून, वितरण समारंभ १४ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे पार पडणार आहे.

प्रा. निलेश डामसे हे वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीच्या मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयात हिंदी विभागप्रमुख म्हणून २००९ पासून कार्यरत आहेत. त्यांनी बी.ए., एम.ए., एम.फिल. पदवी मुंबई विद्यापीठातून, तर पीएच.डी. साठीचा प्रबंध शिवाजी विद्यापीठात सादर केला आहे. ते अध्यापनासोबतच विद्यापीठीय प्रशासन, सांस्कृतिक कार्य, संशोधन क्षेत्रातही सक्रिय असून, शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे सदस्य, सांगली जिल्ह्याचे सांस्कृतिक विभागप्रमुख आणि युवा महोत्सव समितीचे सलग पाच वर्ष सदस्य राहिले आहेत. केंद्रीय हिंदी निदेशालय, दिल्ली यांच्या हिंदी अध्ययन यात्रेत भारतभरातील ५० विद्यार्थ्यांच्या टीम मॅनेजर म्हणून सहभाग घेतला. त्यांनी कुरुक्षेत्र येथील आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून



भूमिका बजावली आहे. पश्चिम महाराष्ट्रात प्रथमच हिंदी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्याचा मानही त्यांना मिळाला आहे.

बी.ए. व एम.ए. वर्गासाठी हिंदी विषयाच्या अध्ययन साहित्याचे लेखन त्यांनी शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासाठी केले आहे. त्यांचे अनेक शोधनिबंध देशभरातील नामांकित हिंदी पत्रिकांत प्रकाशित झाले आहेत. शिमला येथील संस्थेच्या असोसिएट प्रोग्राम अंतर्गत त्यांनी एक महिना वास्तव्यास राहून संशोधन पूर्ण केले आहे.

शैक्षणिक योगदानाबरोबरच त्यांनी ठाणे, अहमदनगर जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पुस्तक वाटप, कार्यशाळा यासारखे उपक्रम राबवले. या कार्याची दखल घेत हिंदुस्तानी प्रचार सभेने त्यांना गौरवले आहे. या गौरवाबद्दल संस्थेचे मानद सचिव ड. बी. एस. पाटील, ड. धैर्यशील पाटील, प्राचार्य डॉ. अंकुश बेलवटकर व महाविद्यालयीन स्टाफने अभिनंदन केले आहे.

# लोकनेते राजारामबापू पाटील महाराष्ट्राचे आदर्श : जे.आर.चव्हाण

आटपाडी : राजारामबापू हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, आटपाडी येथे लोकनेते राजारामबापू पाटील व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त अभिवादन सोहळा पार पडला. यावेळी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून गदिमा हायस्कूल, माडगुळे येथील माजी प्राचार्य जे. आर. चव्हाण आणि आटपाडीतील नामवंत वैद्यकीय व्यवसायिक डॉ. श्रीनाथ पाटील हे उपस्थित होते.



राजारामबापूंनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले. त्यांचे कार्य व रावसाहेबकाका पाटील यांचा वारसा आजही प्रेरणादायी आहे, असे मत जे. आर. चव्हाण यांनी व्यक्त केले. तर शील, शरीर आणि शिक्षण ही त्रीसूत्री अंगीकारल्यास आयुष्य यशस्वी होते. विज्ञाननिष्ठ विचार आणि वेळेचे व्यवस्थापन जीवन घडवतात, असा संदेश डॉ. श्रीनाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमात श्री भवानी एज्युकेशन सोसायटीचे व्हा. चेअरमन सुरज पाटील यांनी राजारामबापू हायस्कूलने आटपाडी तालुक्यात अग्रेसर स्थान मिळवले असून, आमदार जयंतराव पाटील यांनी जलसंपदा मंत्रीपदाच्या कार्यकाळात १०६ गावांना पाणीपुरवठा करून मोठे योगदान दिले, असे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष सादिक खाटीक यांनी राजारामबापूंनी ४७२ शाळा सुरू करून, ग्रामीण शिक्षण, शेती व सहकार क्षेत्रात मोठे योगदान दिले. बापूंच्या कार्याचा पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रासाठी आदर्श ठरतो, असे मत मांडले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापक माणिकराव साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन गणेश ऐवळे सरांनी केले तर आभार एस. एस. कदम सरांनी मानले. कार्यक्रमास विविध मान्यवर, पालक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन

आगाशिवनगर : आदर्श प्राथमिक विद्यालय व शिशुविहार, आगाशिवनगर येथे लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी सिंहगर्जना करणारे जहाल मतवादी लोकमान्य टिळक आणि 'पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर नसून श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे' असे म्हणणारे अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा परिचय बालसभेत चिमुकल्यांनी घेतला. विद्यार्थी प्रतिनिधी शिवम वगरे व अनघा काकडे यांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे



पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक सौ. रूपाली कुंभार यांनी केले. त्यांनी टिळकांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानावर प्रकाश टाकत मराठा आणि केसरी या वृत्तपत्रांद्वारे एकतेचा संदेश दिल्याचे सांगितले. सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. सोयराबानू नदाफ यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यसंपन्न जीवनावर आधारित मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी महापुरुषांवरील भाषणे सादर केली. कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. सचिन शिंदे, शिशुविहारच्या मुख्याध्यापिका सौ. लता नलवडे, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. रंजना कांबळे तर आभार प्रदर्शन सौ. अश्विनी पाटील यांनी केले.